# काहूर

कधी कधी, दमून भागून
पडल्या पडल्या, मिटतो डोळा
कधी कधी, विचारांच काहूर
निद्रेच्या काठी, होतं गोळा.

स्वप्ने, आठव कुण्या काळचे
सरकत जाती मन:पटलावर,
व्यथा कधीची, बात उद्याची
बुबुळे फिरती, आतुनी गरगर.

शब्द बोचरे, नजर चोरटी
वार खोल ते, भाव अनावर,
आली आली म्हणता म्हणता
उडते झोप, वाढते घरघर.

दाबून, सारून घुसमटलेले
नको नको ते ऐकू येते..
त्या वाटेतुन, त्या वळणावर
समोर येऊनी उभे ठाकते!

आत बाहेर अंधार अंधार
आट्या-पाट्या खेळत रहातो
तांबुसलेल्या डोळ्यांनी मग
आपण उद्याची वाट पहातो..

कधी कधीच, दमून भागून
पडल्या पडल्या, मिटतो डोळा
बाकी रोजची कथा हीच..
आणि दिवस चढतो, तोळा तोळा !!

**©प्रीती देशपांडे**

www.meetipreeti.com